पावती म्हणून की काय नाशिक जिल्ह्यात आपला सत्कार झाला तो मुळी एक समृद्ध, कृतिपूर्ण, कृतार्थ, सुखी संपन्न, समाधानी जीवनाचा सत्कार या अर्थाने हे झाले आपले सामाजिक कार्य.

माननीय श्रीमान दादासाहेब आपण ' विद्वत्ता ' शालीनता व नम्रता यांचा त्रिवेणी संगमच आहांत यादृष्टीने आपल्या जीवनाकडे बघताना लक्षात येते का, आपण विद्यार्थी दशेतदेखील अनेक शिष्यवृत्त्या मिळविल्यात तर्कशास्त्र व तत्वज्ञान याची सांगड घालून डेक्कन कॉलेज मध्ये काही दिवस प्राध्यापकाची नोकरी देखील केली, पण याचवेळी वडीलांनी घरचा पारंपारीक व्यवसाय करणेस परत बोलविता क्षणीच आपण प्राध्यापक पदाचा राजीनामा देऊन परत आलात यातून व आपल्या विनम्रतेची साक्ष पटते.

आपण काही कालावधी नंतर वकिली व्यवसाय सुरु केला व त्यातही ' प्रसिद्ध कायदे पंडीत ' प्रथितयश विधीज्ञ म्हणून नांव लौकीक मिळविला. तो या सरस्वती पुत्राकडे लक्ष्मी नांदू लागली याबाबत आपले एकच म्हणणे की, "कर्तृत्व" हेच माणसाला श्रेष्ठत्व मिळवून देते.

आपणास लक्ष्मी व सरस्वतीची पूर्ण कृपा लाभलेली असूनही आपणाकडे गुण ग्राहकता, समाज सेवेची दृष्टी व समाज सुख दुःखाची जाणीव हे देखिल आहेंच.

आपणास जसा ऐहीक जगाच्या ज्ञानाचा ध्यास आहे व त्यातून जशी यशस्वीता लाभलेली आहे. तशीच आंतरीक तळमळ, परमेश्वरी शक्ति विषयी आहे. यासाठी आपण तौलनीक दृष्टच्या गीता पुराणे, अुपनिषदे, संत वाङ्मय, कुराण बायबल, यांचाही सखोल अभ्यास आपण केलेला आहे. तसेच गायत्री, पुरश्चरण, गायत्रीयज्ञादी करुन समाजास सुयोग्य धार्मीक व अध्यात्मीक मार्गदर्शन देखील करतात.

आपणास एकूणतः या आपल्या सर्वांग सुंदर जीवन व्यवसायांस मोठमोठ्या व्यक्तिचे, संत विभूतीचे मार्गदर्शन लाभले आहे, लाभत आहे.

' जो दुसऱ्यासाठी जगतो तेच खरे जीवन ' यानुसार आपण, समाज, गांव, देशासाठी सेवा करीत अहात. ' जीवेत् शरदः शतम् ' आपल्या या सामाजिक, धार्मीक कार्यात आपल्या सहधर्मचारिणी सौ. शांताबाईचाही फार मोठा वाटा आहे. अुभयतांस परमेश्वर दिर्घ आयुः आरोग्य देवो व आम्हां सर्वांना आपली शताद्बी साजरी करण्याची सुवर्ण संधी देवो अशी ह्या अमृत महोत्सवी इश्वर चरणी सविनय प्रार्थना.

पंढरपूर : १९।८।१९८१ ॥ जीवेत् शरदः शतम् ॥

( उखळे प्रिन्टर्स, पंढरपूर. )